# ज्ञानगंगेच्या प्रवाहात आले यंत्रमाग कामगार

## - कुलगुरू डॉ. आर. कृष्णकुमार

मालेगाव :– भारताची अर्थव्यवस्था मजबूत करण्यात वस्त्रोद्योग नेहमीच आघाडीवर राहिला आहे. वर्षानुवर्षे यंत्रमागावर काम करणारे कामगार मात्र स्वातंत्र्याच्या ६२ वर्षानंतरही शिक्षणापासून वंचित राहिला ही खेदाची बाब आहे. शिक्षणापासून दुरावलेल्या या यंत्रमाग कम्मगारांना शिक्षण देण्यासाठी मुक्त विद्यापीठाने पुढाकार घेतला असून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि वस्त्रोद्योग महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने लवकरच “बी.ए. टेक्स्टाईल” हा नवीन शिक्षणक्रम सुरू करणार असल्याचे प्रतिपादन कुलगुरू डॉ. आर. कृष्णकुमार यांनी केले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि मालेगाव महानगरपालिका, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित यांच्या संयुक्त विद्यमाने यंत्रमाग कामगारांना प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमाचे आयोजन ३ फेब्रुवारी २०१२ रोजी मालेगांव येथे करण्यात आले होते. मुक्त विद्यापीठाने आय.टी.आय.च्या तज्ञांमार्फत हजारो यंत्रमाग कामगारांची कौशल्य परीक्षा घेतली होती. त्यापैकी १३०० कामगार उत्तीर्ण झाले असून, त्यांना संयुक्तिकरित्या प्रमाणपत्र वाटप यावेळी करण्यात आले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलताना डॉ. कृष्णकुमार म्हणाले की, येथील यंत्रमाग कामगार अनुभवसंपन्न असल्याने त्यांच्या कामाचे विविधस्तरांवर मुल्यांकन केले असता १०० पैकी ९९ गुण त्यांनी मिळवलेत. केवळ प्रगतीच्या एका गुणात ते मागे राहिलेत. त्यासाठी मुक्त शिक्षण पद्धतीद्वारे काम करता करता शिक्षण देण्यासाठी हे विद्यापीठ गेल्या २२ वर्षापासून शिक्षणाच्या माध्यमातून शिक्षित समाज घडवण्याचे काम करत असल्याचे सांगून विद्यापीठाच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा त्यांनी यावेळी दिला. दिवसातील १२-१२ तास घाम गाळणाऱ्या कामगारांना आर्थिक मोबदला अत्यंत कमी मिळत असल्याने त्यांना स्वतःचा, आपल्या कुटुंबाचा विकास साधता येणे कठीण झाले आहे. अनेकांना इच्छा असूनही केवळ पैसे नसल्या कारणाने शिक्षण घेता येत नाही. त्यामुळे त्यांच्या जीवनातील अंधःकार दूर करण्यासाठी मुक्त विद्यापीठाने पुढे पाउल टाकले असल्याचे डॉ. आर. कृष्णकुमार यांनी सांगितले. यंत्रमागावर काम करण्याबरोबरच शेरो-शायरी, गझल, चित्रपटाची निर्मिती आणि अभिनय करणाऱ्या येथील कामगारांत मोठ्या क्षमता असून केवळ शिक्षणापासून ते वंचित राहिल्याने त्यांना जीवनातील प्रगती साध्य करता आली नाही. परंतु आता या वर्गासाठी मुक्त विद्यापीठाने शिक्षणाचे पंख देऊन त्यांना आकाशात उडण्याची संधी दिल्याचे स्पष्ट करून येथील कामगारांनी उत्तम आयोजानाद्वारे विद्यापीठाचा लौकिक वाढविला असल्याचेही सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.आर.कृष्णकुमार हे होते. तर, मुंबईच्या हिंदुस्थान उर्दू दैनिकाच्या औरंगाबाद आवृत्तीचे संपादक श्री.नायब अन्सारी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. बँक ऑफ महाराष्ट्राचे विभागीय अधिकारी श्री. थोरात, मालेगावचे आयुक्त श्री.जीवन सोनावणे, मौलाना उमरेन, सलमान सय्यद आदी मान्यवरांसोबत मुक्त विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रकाश अतकरे, तसेच या प्रकल्पाचे संयोजक डॉ. जयदीप निकम हे उपस्थित होते. येथील सामाजिक कार्यकर्ते श्री. अतिक शेख यांचा कुलगुरूंच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला.

ख्यातनाम चित्रपट गीतकार श्री. बशर नवाझ यांनी आपल्या भाषणात म्हणाले की, स्वातंत्र्यापूर्वीच्या सरकारने शिक्षणाचा उपयोग स्वतःसाठी केवळ कारकून तयार करण्यापुरता केला, मात्र आज स्वातंत्र्यानंतर त्यात तिळमात्र

बदलझाला नाही अशी खंत व्यक्त केली.  यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने प्रथमच शिक्षणाचा संबंध कौशल्याशी जोडला ही बाब प्रशंसनीय असल्याचे नमूद करतानाच मालेगावातील यंत्रमाग कामगारांसाठी विद्यापीठाने सुरू केलेल्या उपक्रमाचा गौरव करताना “मजबुरीने मेहनत सिखायी, हुनर सिखाया लेकिन इस विश्वविद्यालयने जीवन मे पहलीबार इज्जत दि है”|

प्रसिद्ध उर्दू दैनिक हिंदुस्थानचे संपादक नायब अन्सारी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना, ८० वर्षीय वयापर्यंतचे १३०० यंत्रमाग कामगार एखाद्या विद्यापीठात एका दिवशी प्रवेश घेतात ही बाब केवळ राज्यापुरती नव्हे तर जागतिक स्तरावर इतिहास नोंदविणारी असल्याचे सांगितले.

मौलाना उमरेन यांनी आपल्या भाषणात मालेगाव यंत्रमाग कामगारांसाठी कुलगुरू डॉ. आर. कृष्णकुमार यांनी शिक्षणाचे द्वार उघडून दिले असल्याचे गौरोवोद्गर काढून या कामगारांच्या जीवनात लवकरच सकारात्मक परिवर्तन होईल असा आशावाद यावेळी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अविनाश असनारे यांनी केले तर या प्रकल्पाचे मुख्य समन्वयक डॉ. जयदीप निकम यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या कार्यक्रमासाठीयंत्रमाग कामगार आणि मालेगावचे स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित होते. या सोहळ्यामुळे नागरिकांच्या उत्साहाला उधाण आले होते. यंत्रमाग कामगारांच्या कुटुंबीयांचे प्रफुल्लित चेहरे आणि त्यामुळे संपूर्ण वातावरण हेस्फूर्तीदायी झाले होते. या ऐतिहासिक क्षणांना मालेगावचे ए.टी.टी. हायस्कूलचे पटांगण कायमचे साक्षीदार राहील.

क्षणचित्रे :-

- या समारंभात सहभागी होण्यासाठी हजारो कामगार मिरवणुकीने वाजत गाजत आले.
- या कार्यक्रमानिमित्त येथील यंत्रमाग कामगारांनी शहरातील प्रमुख मार्गावर स्वागत फलक लावण्यात आले होते.
- कामगारांमध्ये मोठा उत्साह असल्याचे चित्र दिसत होते.
- “तुम्ही आले, मालेगावचा विकास झाला” असे फलक उपस्थितांमध्ये झळकत होते.
- कार्यक्रमाच्या शेवटी राष्ट्रगीताने सांगता करून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यात आला.


यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
यंत्रमाग संचालन तंत्रकौशल्य
मा.नायब अन्सारी

